


दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com




सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १८० वा | बुधवार, दि. १८ फेब्रुवारी २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# अजितदादांच्या निधनावर नवा वाद

## ‘ती फाईल दिल्लीहून आली’ राऊतांचा खळबळजनक दावा

**मुंबई (कटूसत्य वृत्त):** राज्याचे दिवंगत नेते अजित पवार यांच्या कथित विमान अपघाती निधनावरून राजकीय वतुर्ळात नव्या आरोप-प्रत्यारोपांना सुरुवात झाली आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे खासदार संजय राऊत यांनी या प्रकरणात गंभीर आणि खळबळजनक दावा करत ‘दादांची एक फाईल थेट दिल्लीला गेली होती आणि ती बंद करण्यास नकार देण्यात आला’ असा आरोप केला आहे.



राऊत यांच्या या विधानामुळे राज्यातील राजकारणात पुन्हा एकदा खळबळ उडाली असून, अपघाताच्या पार्श्वभूमीवर नवे राजकीय संकेत मिळत असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

संजय राऊत यांनी माध्यमांशी बोलताना अजित पवार यांचा मृत्यू ‘नक्कीच संशयास्पद’ असल्याचे म्हटले. ‘इतक्या मोठ्या नेत्याचा मृत्यू होतो आणि त्यावर त्यांच्या कुटुंबीयांनाच सरकारी यंत्रणांवर विश्वास राहत नाही, ही गंभीर बाब आहे,’ असे ते म्हणाले.

राऊत यांनी आ. रोहित पवार यांचा उल्लेख करत सांगितले की, ‘रोहित पवार हे केवळ राजकीय नेते नाहीत, तर कुटुंबातील महत्वाचे सदस्य आहेत. जर कुटुंबालाच संशय असेल आणि त्यांनी खासगी गुप्तहेर संस्थेमार्फत तपास करण्याचा निर्णय घेतला, तर त्याकडे सकारात्मक दृष्टीने पाहायला हवे.’

राऊत यांनी पुढे दावा केला की, अजित पवार काही प्रलंबित फाईल्सच्या पार्श्वभूमीवर भाजपसोबत गेले होते. मात्र त्या फाईल्सपैकी एक महत्त्वाची फाईल त्यांच्या मृत्यूपूर्वी पुन्हा उघडण्यात आली.

ही फाईल जरंडेश्वर साखर कारखाना कर्जप्रकरणाशी संबंधित असल्याचा दावा राऊत यांनी केला. या प्रकरणात कथित घोटाळ्याच्या आरोपांमुळे साखर कारखान्याची संपत्ती जप्त करण्यात आली होती.

राऊत यांच्या म्हणण्यानुसार, संबंधित फाईल महाराष्ट्रातून थेट केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे पाठवण्यात आली होती. ‘ती फाईल बंद करू नये,’ असा नकारात्मक शेरा मारून ती पुन्हा महाराष्ट्रात पाठवण्यात आली, असा त्यांचा आरोप आहे.

राऊत यांनी पुढे म्हटले की, फाईल बंद न झाल्यामुळे राज्यातील काही मंत्र्यांकडून ‘दादा, तुमची फाईल आमच्याकडे आहे’ अशा सूचक इशाऱ्यांची चर्चा सुरू झाली. ‘ज्या कारणासाठी अजित पवार भाजपसोबत गेले, ते कारणच संपले नाही,’ असा दावा त्यांनी केला.

त्यांच्या म्हणण्यानुसार, त्यानंतर अजित पवार यांनी पुन्हा राजकीय भूमिका बदलण्याचा विचार सुरू केला आणि ‘तेथूनच या रहस्यमय घडामोडींना सुरुवात झाली.’

राऊत यांच्या आरोपांवर भाजप किंवा केंद्र सरकारकडून अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. तसेच संबंधित फाईलविषयी कोणतीही अधिकृत माहिती सार्वजनिक करण्यात आलेली नाही. दरम्यान, अजित पवार यांच्या निधनाबाबत अधिकृत तपास यंत्रणांकडून तांत्रिक चौकशी सुरू असल्याचे सांगितले जात आहे. अपघाताचे नेमके कारण, ब्लॅक बॉक्समधील माहिती आणि इतर तांत्रिक बाबींचा अहवाल अद्याप प्रतीक्षेत आहे.

या प्रकरणामुळे महाराष्ट्रातील राजकीय वातावरण अधिकच तापले आहे. विरोधकांकडून पारदर्शक आणि निष्पक्ष चौकशीची मागणी होत असताना, सत्ताधारी पक्ष आरोपांना राजकीय हेतूने प्रेरित असल्याचे सांगत आहे.

# ‘हा अपघात नाहीच!’ -आ. अमोल मिटकरी

## ब्लॅक बॉक्सच्या गुपितावरून महाराष्ट्रात नवा भूकंप

**पुणे (कटूसत्य वृत्त) :-** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या 28 जानेवारी रोजी झालेल्या कथित विमान अपघातानंतर राज्यातील राजकारण ढवळून निघाले आहे. अपघात की घात? या प्रश्नाने आधीच राजकीय वातावरण तापले असताना, आता राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी ब्लॅक बॉक्सच्या गूढावरून गंभीर शंका उपस्थित करत ‘हा अपघात नाहीच!’ असा थेट आरोप केला आहे. दरम्यान, आ. रोहित पवार यांनी यापूर्वीच तपास प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत स्वतंत्र आणि पारदर्शक चौकशीची मागणी केली होती. आता आ. मिटकरी यांच्या विधानांमुळे या प्रकरणाला नव्या राजकीय वादळाची किनार मिळाली आहे.

आ.अमोल मिटकरी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म ‘एक्स’वर अपघातग्रस्त विमानाचा एक फोटो शेअर करत विमानाच्या टेल (शेपटी) भागाकडे लक्ष वेधले. त्यांच्या मते, ब्लॅक बॉक्स सामान्यत: विमानाच्या शेपटीत बसवला जातो, कारण अपघाताच्या वेळी पुढील भागाला सर्वाधिक धक्का बसतो, तर टेल भाग तुलनेने सुरक्षित राहतो.





मिटकरी यांनी दावा केला की, समोर आलेल्या छायाचित्रात विमानाची शेपटी पूर्णपणे जळालेली किंवा नष्ट झालेली दिसत नाही. अशा परिस्थितीत ब्लॅक बॉक्स पूर्णत: नष्ट होणे किंवा त्यातील डेटा नष्ट होणे शक्य नाही, असा त्यांचा युक्तिवाद आहे. ‘ब्लॅक बॉक्स अत्यंत उच्च तापमान सहन करण्यासाठी तयार केलेला असतो. तीव्र आगीतही त्यातील डेटा सुरक्षित राहतो. मग तो जळाला कसा? त्यातील माहिती उपलब्ध का होत नाही?’ असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला.

आ.मिटकरी यांच्या वक्तव्यामुळे राज्यातील राजकीय वातावरण अधिकच तापले आहे. विरोधी गटांकडून या प्रकरणाची उच्चस्तरीय आणि स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी होत आहे. काही नेत्यांनी केंद्रीय तपास यंत्रणेच्या ऐवजी आंतरराष्ट्रीय स्तरावरील यंत्रणेकडे चौकशी सोपवावी, अशीही मागणी केली आहे.

दुसरीकडे, सत्ताधारी पक्षातील नेत्यांनी या आरोपांना ‘राजकीय प्रसिद्धीसाठी केलेली वक्तव्ये’ असे म्हणत फेटाळले आहे. अधिकृत तपास पूर्ण होण्यापूर्वी निष्कर्ष काढणे योग्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या घटनेनंतर संबंधित अधिकृत यंत्रणांनी तांत्रिक तपास सुरू केल्याची माहिती देण्यात आली आहे. विमानाचे अवशेष, ब्लॅक बॉक्सची स्थिती, हवामान परिस्थिती, पायलटचा संवाद आणि उड्डाणातील तांत्रिक बाबींचा सखोल अभ्यास केला जात असल्याचे सूत्रांनी सांगितले. तज्ज्ञांच्या मते, ब्लॅक बॉक्समध्ये ‘फ्लाइट डेटा रेकॉर्डर’ (FDR) आणि ‘कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डर’ (CVR) या दोन प्रणाली असतात. त्या प्रामुख्याने विमानाच्या शेपटीत बसवल्या जातात. मात्र अपघाताचा प्रकार, स्फोट, इंधन गळती, आगीची तीव्रता किंवा धडकेचा कोन यावर नुकसानाचे प्रमाण अवलंबून असते.

राज्याच्या राजकीय वर्तुळात आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये या अपघाताबाबत संभ्रमाचे वातावरण आहे. सोशल मीडियावर विविध तर्क-वितर्कांना उधाण आले असून, अधिकृत तपास अहवाल लवकरात लवकर सार्वजनिक करण्याची मागणी जोर धरत आहे.

दरम्यान, अजितदादांच्या निधनामुळे राज्याच्या राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या आकस्मिक मृत्यूमुळे शोककळा पसरली असली तरी, आता या घटनेमागील सत्य काय, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

अधिकृत तपास अहवाल आल्यानंतरच अपघात की घात या प्रश्नाचे उत्तर स्पष्ट होणार असले, तरी सध्या तरी या प्रकरणाने महाराष्ट्राच्या राजकारणात नव्या भूकंपाला तोंड फोडले आहे.

# सोलापूर महापालिकेत स्वीकृत नगरसेवकपदासाठी राजकीय उत्सुकता



**स्वीकृत नगरसेवकपदासाठी अनेकांची नावे चर्चेत**

सोलापूर महापालिकेत भारतीय जनता पक्षाला घवघवीत यश मिळाल्याने या पक्षाकडे स्वीकत नगरसेवकपदासाठी इच्छुकांची रांग लागली आहे. त्यासाठी अनेक नावे चर्चेत आहेत. मात्र कोणाला स्वीकृत नगरसेवकपदाची लॉटरी लागणार? हे आता बुधवारीच स्पष्ट होईल.

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महापालिकेतील स्वीकृत नगरसेवकपदासाठी राजकीय वतुर्ळात कमालीची उत्सुकता निर्माण झाली आहे. बुधवार, १८ रोजी सकाळी ११ ते ११.३० या कालावधीत चित्र स्पष्ट होणार आहे.

समितीच्या निवडीकडे अनेकांचे लक्ष लागून राहिले आहे. स्वीकृत नगरसेवक पदासाठी सत्ताधारी भारतीय जनता पार्टीकडे शेकडो अर्ज आलेले आहेत.

शुक्रवार, २० फेब्रुवारीच्या सर्वसाधारण सभेत स्वीकृत नगरसेवकांची नियुक्ती होणार आहे. त्यापूर्वी इच्छुक उमेदवारांना बुधवार, १८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते दुपारी १.३० वाजेपर्यंत नगरसचिव कार्यालयात अर्ज दाखल करावे लगणार आहेत. सोलापूर महानगरपालिकेच्या एकूण १०२ जागांसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान तर १६ जानेवारी २०२६ रोजी मतमोजणी झाली.

या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने घवघवीत यश संपादन करत तब्बल ८७ जागा आपल्या पारड्यात पाहून घेतले. गटनेता, महापौर, उपमहापौर पदाच्या निवडीनंतर आता स्वीकृत नगरसेवक, स्थायी समिती, परिवहन स्वीकृत नगरसेवकपदाच्या एकूण १० जागा असून या पदासाठी भारतीय जनता पार्टीच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, माजी उपमहापौर पद्माकर काळे, माजी नगरसेवक प्रभाकर जामगुंडे यांच्यासह आणखी तीन ते चारजणांची नावे जवळपास निश्चित मानली जात आहे.

श्री सिध्देश्वर देवस्थानचे अध्यक्ष धर्मराज काडादी, राष्ट्रीय जलतरणपटू राघवेंद्र मिड्डाकोल, माजी नगरसेवक गुरुशांत घुत्तरगांवकर, मातंग समाजाचे राज्य समन्वयक सुरेश पाटोळे, मराठा समाजाचे श्रीकांत घाडगे यांचीही नावे स्वीकृत नगरसेवकपदासाठी पुढे केली जात आहेत. स्वीकृत नगरसेवकपदी कोणाला संधी मिळणार ते बुधवारी चित्र स्पष्ट होणार आहे.

# फायनान्सला दिलेला चेक बाऊन्स, आरोपीस १ वर्षाचा कारावास व चेकच्या दुप्पट दंड

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर येथील मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी विनायक एम. रेडकर सो. यांनी आरोपी आनंद अशोक शिवणगी यास फियार्दी विजय फायनान्सला दिलेला चेक बाऊन्स केल्याप्रकरणी दोषी धरून, त्यास १ वषार्चा कारावास, नुकसान भरपाई म्हणून चेकच्या दुप्पट रक्कमेचा दंड, सदरची रक्कम जमा न केल्यास ६ महिने अधिकचा कारावास व तसेच चेकच्या रक्कमेवर ९% द.सा.द.शे. प्रमाणेची रक्कम फियार्दीस देण्याबाबत शिक्षा सुनावलेली आहे. अशी माहिती ॲड. सुरेश बिराजदार यांनी पत्रकार परिषदेत दिली.



यात केसची थोडक्यात हकीकत की, दिनांक ११/०३/२०२२ रोजी आरोपीने लघू व्यवसाय सुरू करण्यासाठी म्हणून विजय फायनान्सकडून रक्कम रु. ५०,०००/- चे कर्ज घेतलेले होते. आरोपीने नियमीतपणे कर्जाची परतफेड न केल्यामुळे त्याच्या कर्ज खात्यामध्ये दिनांक ११/०८/२०२३ रोजी रक्कम रु.२९,७६५/- इतकी रक्कम थकीत होती. सदरची थकीत रक्कम जमा करण्यासाठी फियार्दीनी आरोपीकडे मागणी केली असता, त्याने रक्कम रु. २९,७६५/- चा चेक विजय फायनान्सच्या नावे दिलेला होता. सदरचा चेक वटविणेकामी बँकेत सादर केला असता, तो अपु-या रक्कमेपोटी न वटता परत आलेला होता. त्याबाबत विजय फायनान्सनी आरोपीस वकीलामार्फत रितसर नोटीस पाठवून, सदरची रक्कम १५ दिवसाच्या आत फायनान्समध्ये जमा करण्याची संधी दिलेली होती, परंतू आरोपीने सदरची रक्कम जमा केली नाही.

त्यानंतर विजय फायनान्सनी आरोपी विरूध्द ॲड. सुरेश अ. बिराजदार यांच्यामार्फत सोलापूर येथील मा. न्यायालयात दि निगोशिएबल इन्ट्रुमेंट ॲक्ट १८८१ चे कलम १३८ अन्वये खासगी फिर्याद दाखल केलेली होती. त्यामध्ये फियार्दीच्या वकीलांनी दाखल केलेला कागदोपत्री पुरावा व वकीलांनी केलेल्या अंतिम युक्तीवादावरून, मे. कोटार्नी आरोपी नामे आनंद अशोक शिवणगी यास चेक बाऊन्स केल्याप्रकरणी दोषी धरून, त्याला वर नमुद केल्याप्रमाणे कारावासाची शिक्षा सुनावलेली आहे. असे ॲड. सुरेश बिराजदार यांनी सांगितले. यात फियार्दी विजय फायनान्स तर्फे ॲड. सुरेश बिराजदार यांनी काम पाहीले.

या पत्रकार परिषदेला संचालक गणेश चौटे, विजय चौटे उपस्थित होते.

# थोरला मंगळवेढा तालीमतर्फे शिवजन्मोत्सवनिमित्त २५ हजार लोकांना शिवभोजन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त थोरला मंगळवेढा तालीमतर्फे २५ हजार लोकांना शिवभोजन देणार येणार आहे, अशी माहिती तालमीचे आधारस्तंभ, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख व नगरसेवक अमोल शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



शिवजन्मोत्सवनिमित्त सोलापुरात मोठ्या प्रमाणात मिरवणुका काढण्यात येतात. या मिरवणुका पाहण्यासाठी येणाऱ्या शिवभक्तांसाठी आणि बंदोबस्तासाठी असणाऱ्या पोलीस बांधवांसाठी तसेच शहर जिल्हयातून येणाऱ्या सुमारे 25 हजार शिवप्रेमींसाठी शिवभोजनाचे आयोजन १९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सहा ते रात्री बारा वाजेपर्यंत छत्रपती शिवाजी महाराज चौकातील यात्री कॉटेज येथे बाजी आण्णा मठाजवळ, सोलापूर येथे करण्यात आले आहे. जेवण्यासाठी टेबल खुर्च्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांच्या हस्ते तसेच महापालिका डॉ. सचिन ओम्बासे, पोलीस उपायुक्त विजय कबाडे, मनपाचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, अक्कलकोट अन्नछत्र मंडळाचे जन्मेजयराजे भोसले, अमोलराजे भोसले, आ. विजयकुमार देशमुख, महापौर विनायक कोंड्याल आदींच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

सुमारे 250 वाढपी तसेच सुमारे 500 कार्यकर्ते या उपक्रमात आपली सेवा देणार आहेत. सन २०१७ पासून शिवभोजन उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. सर्व शिवभक्तांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन अमोल शिंदे यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेला अमोल कदम, कपिल पिसे, राहुल गोयल, समीर लोंढे आदी उपस्थित होते.

# आरटीई प्रवेशाला सुरुवात; १० मार्चपर्यंत मुदत

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियमांतर्गत (आरटीई) दुर्बल आणि वंचित घटकातील बालकांना स्वयं अर्थसहाय्यित शाळा, विना अनुदानित शाळांमध्ये २०२६-२७ या वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया १७ फेब्रुवारीपासून ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. पालकांना १० मार्चपर्यंत https://student.maharashtra.gov.in/adm_portal या संकेतस्थळावरून अर्ज करता येणार आहे. ही प्रक्रिया राबविण्याबाबत सुधारित सूचना निर्गमित करण्यात आल्याची माहिती शालेय शिक्षण संचालक (प्राथमिक) शरद गोसावी यांनी दिली आहे.




आरटीई अंतर्गत दुर्बल व वंचित घटकांतील बालकांना स्वयं अर्थसहाय्यित शाळा, विनाअनुदानित शाळांमध्ये इयत्ता पहिली किंवा पूर्व प्राथमिक वर्ग या स्तरावर २५ टक्के प्रवेश प्रक्रियेकरिता पालकांनी ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. वंचित घटकांतील बालकांमध्ये अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी), विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), (क), (ड) इतर मागासवर्ग (ओबीसी), विशेष मागासवर्ग (एसबीसी), आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागास घटक, एचआयव्ही बाधित किंवा प्रभावित बालक, अनाथ बालके, दिव्यांग बालके अथवा कोविड प्रभावित बालकांचा समावेश होतो.

तर, आर्थिक वर्षामध्ये पालकांचे वार्षिक उत्पन्न एक लाखापेक्षा कमी आहे अशा बालकांचा आर्थिक दुर्बल गटामध्ये समावेश होतो. बालकांच्या पालकांना त्यांच्या निवासस्थाच्या ठिकाणापासून एक किमी पेक्षा कमी अंतरावरील शाळा (हवाई अंतर) आरटीई पोर्टलवर दिसतील. या अनुषंगाने प्रक्रियेकरिता विचारपूर्वक १० शाळांची निवड करावी. तसेच ज्या बालकांच्या प्रवेशासाठी यापूर्वी आरटीई २५ टक्के अंतर्गत शाळेत प्रवेश घेतला असल्यास सदर बालकासाठी पुन्हा अर्ज करता येणार नसल्याचे शिक्षण संचालनालयामार्फत जाहीर करण्यात आले आहे. अर्ज करताना आवश्यक कागदपत्रे जोडण्यात यावीत, अचूक माहिती भरण्यात यावी, तसेच विहित मुदतीमध्ये परिपूर्ण अर्ज भरला जाईल याची दक्षता घ्यावी. प्रवेश प्रक्रियेदरम्यान काही समस्या असल्यास आरटीई पोर्टलवर मदत केंद्रांची माहिती देण्यात आलेली आहे. त्यांच्याशी संपर्क करुन समस्येचे निराकरण करता येईल, असेही शिक्षण संचालनालयामार्फत कळविण्यात आले आहे. ऑनलाईन अर्ज सादर करण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ऑनलाईन सोडत काढण्याकरिता दिनांक निश्चित केला जाणार आहे. पालकांनी अर्ज भरताना जी आवश्यक कागदपत्रे नोंदवली आहेत, त्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती व साक्षांकित प्रती प्रवेशासाठी तयार ठेवणे बंधनकारक असणार आहे.









## संपादकीय

# 'एनए'मुक्ततेतून भ्रष्टाचाराला मूठमाती?

महाराष्ट्राचा कणा असलेला महसूल विभाग आता कात टाकत आहे. तंत्रज्ञान, पारदर्शकता आणि शेतकरी-केंद्रित धोरणांच्या माध्यमातून राज्याचा चेहरामोहरा बदलण्याचा मानस आहे. 'इझ ऑफ लिव्हिंग आणि इझ ऑफ डुइंग बिझनेस' या सूत्रांवर यंदाचे वर्ष बेतलेले असेल. मागच्या वर्षात निर्णय घेतले, सूत्र ठरवले. अंमलबजावणी सुरूही झाली. आता कालबद्धपद्धतीने योजना, उपक्रम, निर्णय राबवत आहोत. लोककल्याणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे लक्ष आहे. सर्वसामान्यांना अडचणीचे ठरतील असे ब्रिटिशकालीन किचकट कायदे बदलून ते सुसह्य करण्याचा आमच्या सरकारचा आणि विभागाचा प्रयत्न आहे. त्यातूनच अकृषक (एनए) परवानगीची अट रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. नगररचना विभागाची परवानगी घेतल्यानंतर जिल्हाधिकार्यांच्या स्वतंत्र परवानगीची गरज आता संपली आहे.मैलाचा दगड ठरावा असा हा निर्णय आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वप्नातील विकसित महाराष्ट्राचे लक्ष्य साध्य करण्यासाठी राज्यातील पाणंद रस्त्यांचा वाटा सर्वांत मोठा असणार आहे. हे रस्ते ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या 'धमन्या' आहेत. ते दर्जेदार झाले, तर शेतमालाची ने-आण जलद होईल, आधुनिक यंत्रसामग्री शेतात पोहोचेल. इंडस्ट्री आणि सेवा क्षेत्राला ग्रामीण भागात वाव मिळेल. मोठी आर्थिक उलाढाल आणि रोजगार निर्मिती होईल. आम्ही प्रशासनातील क्लिष्टता कमी करण्यावर व सुसूत्रीकरणावर भर दिला आहे. सामान्य माणसाने आपल्या आयुष्याची जमापुंजी एकत्र करून शहराच्या परिघावर एखादा छोटा भूखंड किंवा घर घेण्याचे स्वप्न पाहिले, की त्याच्यासमोर सर्वांत मोठा डोंगर उभा राहत असे, तो 'एनए' (नॉन- ॲग्रिकल्चरल) अर्थात अकृषक परवानगीचा. पण आता काळ बदलला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील आमचे सरकार 'इझ ऑफ लिव्हिंग'साठी कटिबद्ध आहे. याच संकल्पनेतून आम्ही १० फेब्रुवारी २०२६ रोजी एक ऐतिहासिक निर्णय घेतला- तो म्हणजे 'एनए'च्या त्रासातून सर्वसामान्यांची आणि उद्योजकांची कायमची मुक्तता करण्याचा.

### ऐतिहासिक बदल कोणते?

आम्ही घेतलेल्या नवीन निर्णयानुसार, आता ज्या जमिनी विकास आराखड्यात किंवा प्रादेशिक योजनेत समाविष्ट आहेत, तिथे वेगळ्या 'एनए' परवानगीची किंवा वेगळी सनद घेण्याची गरज उरलेली नाही.

(१) नियोजन प्राधिकरणाची मान्यताच अंतिम - जमिनीचा झोन रहिवासी, औद्योगिक किंवा व्यावसायिक म्हणून आधीच निश्चित झाला असेल आणि तिथल्या स्थानिक प्राधिकरणाकडून (उदा. नगरपालिका, महानगरपालिका, पीएमआरडीए, एनएमआरडीए) बांधकाम नकाशा मंजूर करून घेतला असेल, तर महसूल विभागाकडे 'एनए'साठी धाव घेण्याची गरज नाही. बांधकाम परवानगी हीच 'एनए' परवानगी मानली जाईल.

(२) एनए टॅक्सचा विळखा सुटला - आजवर जमिनी 'एनए' झाल्यानंतर दरवर्षी अकृषक कर भरावा लागत होता. हा कर भरण्यासाठी आणि त्याच्या पावत्या जपण्यासाठी लोकांची मोठी कसरत व्हायची. आम्ही हा वार्षिक करच रद्द करण्याचा धाडसी निर्णय सरकारने घेतला आहे. आता फक्त एकदाच 'रूपांतरण शुल्क' (कन्व्हर्जन प्रीमियम) भरले की काम झाले. दरवर्षीच्या कटकटीतून जनतेला दिलासा मिळाला आहे.

(३) एकवेळचे शुल्क - बाजारमूल्याच्या किमान ०.५ टक्क्यांपर्यंत रूपांतरण शुल्क आकारले जाईल. हे शुल्क भरल्यानंतर कोणत्याही अटी किंवा शर्तीशिवाय जमिनीचा वापर अकृषक म्हणून करता येईल. यात महसूल विभागाचा कोणताही अधिकारी आडकाठी करू शकणार नाही.

### निर्णयाची व्याप्ती आणि परिणाम

हा निर्णय केवळ कागदोपत्री नाही, तर त्याचा थेट परिणाम महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवर आणि सामाजिक रचनेवर होणार आहे. आज हजारो गृहप्रकल्प किंवा छोटे भूखंडधारक केवळ एनएच्या तांत्रिक त्रुटींमुळे रखडले आहेत. अनेक ठिकाणी जमिनीचा वापर बदलला आहे, पण कागदपत्रांवर ती आजही शेतजमीनच दिसते. यामुळे खरेदी-विक्रीमध्ये अडचणी येतात आणि बँकांकडून कर्ज मिळवताना सर्वसामान्यांची अडवणूक होते. आता या निर्णयामुळे सर्व मालमत्तांचे रेकॉर्ड स्वच्छ (क्लिअर टायटल) होतील. जेव्हा एखादा उद्योजक महाराष्ट्रात गुंतवणूक करू इच्छितो, तेव्हा त्याला सर्वात आधी जमिनीच्या प्रश्नाला सामोरे जावे लागते. उद्योग उभा करण्यापेक्षा जमिनीची कागदपत्रे गोळा करण्यातच त्याचा निम्मा उत्साह मावळतो. पण आता, जर ती जमीन औद्योगिक झोनमध्ये असेल, तर त्याला फक्त रूपांतरण शुल्क भरून थेट कामाला सुरुवात करता येईल. परवाना राज संपवून 'प्रशासन मित्र' ही संकल्पना आम्ही प्रत्यक्षात आणली आहे.

### कुळकायदा आणि वर्ग-२ बाबत स्पष्टता

येथे एक महत्त्वाची गोष्ट स्पष्ट करणे आवश्यक आहे. अनेक जमिनी या 'भोगवटादार वर्ग-२'मध्ये येतात किंवा त्यांना कुळकायद्याच्या अटी लागू असतात अशा जमिनींच्या बाबतीत जिल्हाधिकार्यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यकच राहील, जेणेकरून शासनाचा महसूल बुडणार नाही आणि मूळ अटींचे उल्लंघन होणार नाही. मात्र, एकदा परवानगी मिळाली की, पुन्हा 'एनए'च्या दुहेरी फेर्यात त्यांना अडकावे लागणार नाही. ही प्रक्रिया सुटसुटीत व्हावी यासाठी आम्ही ऑनलाइन प्रणाली अधिक सक्षम करत आहोत.

### महसूलचा रोड मॅप

आम्ही सातबारा संगणकीकृत केला, फेरफार ई-प्रणालीद्वारे सुरू केली. आता हा 'एनए' मुक्ती हे भ्रष्टाचाराला मूठमाती देण्याचे हत्यार आहे. जिथे मानवी हस्तक्षेप कमी होतो, तिथे पारदर्शकता वाढते. या निर्णयामुळे तलाठी कार्यालयापासून ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंतचा फाइल्सचा प्रवास थांबणार आहे. ज्या प्रमाणे गृह विभाग जनतेच्या जीविताचे रक्षण करतो, कायदा व सुव्यवस्था सांभाळते अगदी त्याच पद्धतीने महसूल विभाग महाराष्ट्रातील १४ कोटी जनतेच्या मालमत्तेचे रक्षण करतो. महसूल मंत्रीपदाच्या माझ्या वाटचालीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मला मिळालेले मार्गदर्शन सर्वसामान्यांना दिलासा देण्यासाठी महत्त्वाचे ठरत आहे. त्यांनी मी महसूलमंत्री झाल्याबरोबर मला आराखडा दिला. त्यातून महसूल अधिकार्यांच्या परिषदा घेण्याच्या सूचना केल्या. तेथील मंथनातून महसूलचा रोड मॅप ठरला. शेतकरी व शेतीहिताला सर्वोच्च प्राधान्य, गरिबांसाठी घरे, मालमत्ता रक्षण, पर्यावरण संरक्षण, विद्यार्थी हित, विस्थापितांना आधार, शासकीय कामांत प्रोत्साहनासाठी कर्मचारी-अधिकार्यांना पदोन्नती, गतिमान व पारदर्शी प्रशासनासाठी कठोर निर्णय घेतले. तुकडेबंदी कायद्यामुळे जवळपास ६० लक्ष कुटुंबांच्या, म्हणजे सुमारे तीन कोटी नागरिकांच्या घरांत आनंदाचे वातावरण निर्माण झाले. एक गुंठा आकारापर्यंतच्या तुकड्यांना कायदेशीर दर्जा देण्यासाठी तुकडेबंदी कायदा शिथिल करून, त्याच्या वापराबाबतची कार्यपद्धती ठरवली आहे. 'वन डिस्ट्रिक वन रजिस्ट्रेशन', ७७३ अधिकार्यांची पदोन्नती, सेवाज्येष्ठता सूची, महापालिका व नगरपरिषद क्षेत्रात नकाशा योजना, स्वामित्व योजना, शेताच्या बांधावरील शेतरस्ते १२ फूट करण्याचा निर्णय, २०११ पूर्वीच्या सर्व घरांना मालकी हक्क देणे, मुंबई शहर आणि मुंबई उपनगरांसाठी दस्तनोंदणी कार्यक्षेत्र एक केल्याने एकाधिकार संपला, नवीन वारसांना स्थान देणारे जिवंत सातबारा अभियान राबविण्यात आले.

मराठवाड्यातील इनाम जमिनी 'बिनभोगवटादार वर्ग-२' मधून मुक्त करण्यात आल्या. यामुळे लाखो कुटुंबांसाठी जमिनीचे व्यवहार सुलभ झाले. दशकाहून जुना असलेला 'मदतमाश इनाम जमिनीं'च्या हस्तांतराचा प्रश्न सुटला. भोगवटादार वर्ग-२च्या जमिनी अकृषक कारणासाठी बँकांकडे गहाण ठेवताना आकारल्या जाणाऱ्या तारण शुल्काला कायदेशीर आधार मिळाला. महसूल मंत्र्यांकडील अर्धन्यायिक अधिकार राज्यमंत्री आणि सचिव (अपील) यांना प्रदान करण्यात आले. यामुळे १३ हजारांहून अधिक प्रलंबित अर्धन्यायिक प्रकरणे निकाली तर निघतीलच, शिवाय नायब तहसीलदार ते मंत्री स्तरावरील अपील ९० दिवसांच्या आतच निकाली काढण्याचे नियोजन केले जाईल. 'मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजना' राबविण्यास मान्यता मिळाली. आता शेतकर्यांना शेतापर्यंत पोहोचण्यासाठी बारमाही रस्ते उपलब्ध होतील. गाळ, माती, मुरूम यासाठीचे स्वामित्व शुल्क पूर्णपणे माफ होईल. अतिक्रमणे हटविली जातील.

महसूल खात्याची जबाबदारी स्वीकारताना मी शब्द दिला होता; हा विभाग शेतकऱ्यांचा शत्रू वाटता कामा नये. महसूल विभागाने शेतकर्यांच्या दुःखांना हात घातला आणि त्यातून निर्माण झाला शेतकरी-हिताचा एक स्पष्ट, ठोस आणि परिणामकारक पॅटर्न. शेतकर्याच्या हातातील खरे मालकीपत्र सातबारा हा शेतकर्याच्या आयुष्याचा श्वास आहे. पण दशकानुदशके वारसनोंद न झाल्याने, हिस्सा न पडल्याने, बोजा न सुटल्याने लाखो सातबारे मृत झाले होते. बँकेने कर्ज नाकारले, पीकविमा मिळाला नाही, जमीन विकता आली नाही. आम्ही ठरवले की, ३१ मार्च २०२६ पर्यंत राज्यातील प्रत्येक सातबारा जिवंत करायचा. आज लक्षावधी सातबार्यांवर वारसनोंदी पूर्ण झाल्या आहेत.

'सरकार आपल्या दारी' हे ब्रीदवाक्य कृतीत आणले आहे. या निर्णयामुळे प्रकल्प वेळेत पूर्ण होतील आणि व्याजाचा बोजा बिल्डरांवरून कमी होऊन तो ग्राहकांसाठी फायदेशीर ठरेल. लालफितीचा कारभार बाजूला सारून एका नव्या युगाकडे वाटचाल करत आहोत. पुढच्या टप्प्यात नोंदणी कार्यालये ही हायटेक करायची आहेत. तंत्रज्ञान हा भ्रष्टाचारावरचा सर्वांत उत्तम उपाय आहे. संपूर्ण महसूल विभाग आम्ही ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर आणणार आहोत, ज्यामुळे जमिनीच्या नोंदींमध्ये कोणीही फेरफार करू शकणार नाही. महसूल विभागाच्या ५५ प्रकारच्या सेवा सुलभ केल्या आहेत. लोकाभिमुख प्रशासनासाठी आता आम्ही व्हॉट्सॲपचा वापर करणार आहोत. आमच्या १२ महत्त्वाच्या सेवा थेट तुमच्या व्हॉट्सअपवर उपलब्ध होतील. 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियाना'अंतर्गत नागरिकांची सर्व महसूलविषयक कामे एकाच ठिकाणी निस्तरली जातात. पुढच्या काळात हे अभियान आणखी सुलभ होईल.

# भेदभाव न बाळगता जनतेच्या उत्थानासाठी; शिवरायांच्या आदर्शाचे पालन राजकीय पुढाऱ्यांनी करावे



छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती हा एक महाराष्ट्राचा उत्सवाचा सण असुन देशासाठी गौरवाचा आणि महत्वपूर्ण दिवस आहे. त्याचप्रमाणे जगाला गनीमीकाव्याची शिकवण छत्रपती शिवाजी महाराजांपासुन मिळाली आहे. त्यालाच आपण आज गोरीला वॉर सुध्दा म्हणतो. त्याची उत्पत्ती गनीमीकव्यातुनच झाली आहे.म्हणुनच जगात शिवाजी महाराजांच्या इतिहासाला आगळेवेगळे महत्त्व आहे. १९ फेब्रुवारीला देशासह संपूर्ण महाराष्ट्रात शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते.सन १८६९ साली महात्मा जोतिबा फुले यांनी रायगडावरील शिवाजी महाराजांची समाधी शोधून काढली व त्यांच्या जीवनावर सर्वप्रथम पोवाडा लिहिला. शिवाजी महाराजांचे कार्य लोकांपर्यंत पोहोचावे यासाठी फुलेंनी सन १८७० साली शिवजयंतीची सुरूवात केली.ती पहीली शिवजयंती होती.त्यानंतर शिवजयंतीच्या माध्यमातून लोकांना एकत्र करण्याचे काम लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी केले. २० व्या शतकात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी देखील शिवजयंती साजरी केली व दोन वेळा शिवजयंतीच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या थाटात शिवजयंतीला सुरूवात झाली.महाराष्ट्र सरकारने २००१ पासून शके १५५१ (शुक्रवार १९फेब्रुवारी १६३०) ही शिवजयंतीची तारीख स्वीकारली त्यानुसार महाराष्ट्र सरकारने १९ फेब्रुवारी सार्वजनिक सुट्टी जाहिर केली.इतर संभाव्य तारखांमध्ये ६ एप्रिल १६२७ (वैशाख शुद्ध तृतीया) ही जन्म तारीख मानली जाते. त्यानुसार महाराष्ट्राबाहेर अनेक लोक शिवजयंतीचा दिवस म्हणून वैशाख शुद्ध तृतीया हा दिवस मानतात. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या दिनदर्शिकामध्ये शिवजयंतीची वेगवेगळी तारीख दाखवीली आहे. महाराष्ट्रात शिवजयंतीच्या तारखेला महत्व नसुन त्यांचे कर्तुत्व,त्यांचा त्याग,रयतेची जबाबदारी आणि लाखोंनी सैन्य घेऊन चढाई करणाऱ्या मोगल साम्राज्याचा अंत करणे हे महत्वाचे आहे.मी तर म्हणेल की शिवजयंती रोज साजरी व्हावी आणि शिवाजी महाराजांचे गोडवे जनतेपर्यंत पोहचवावे. तेव्हाच भारतात एकच नाही तर लाख शिवा तयार होतील. कारण शिवाजी महाराजांच्या पुण्यांयीनेच आज आपण ताठ मानाने आणि स्वाभिमानाने जगत आहोत. गनीमीकाव्याने मोगलायीचा व मोगल साम्राज्याचा अंत केला व हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. याचा गर्व महाराष्ट्रासह संपूर्ण भारताला आहे. आज भारताची गौरव गाथा जी आपण ऐकतो त्याचे संपूर्ण श्रेय शिवरायांनाच आहे.शिवाजी महाराज म्हणजे महाराष्ट्रासह संपूर्ण भारताची अबाध्य शक्ती आहे. शिवजयंतीच्या निमित्ताने शिवाजी महाराजांचे विचार समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहचले पाहिजे.जानता राजा, रयतेचा राजा, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक म्हणून जगभर ख्याती प्राप्त आहे.त्यामुळे केवळ महाराष्ट्रातच किंवा भारतातच नव्हे तर संपूर्ण जगभरात शिवाजी महाराजांचे नाव आदराने आणि स्वाभिमानाने घेतले जाते. तत्वज्ञ, इतिहासकार शिवाजी महाराजांवर अभ्यास करण्यासाठी भारतात येतात. १९ फेब्रुवारी रोजी सुमारे १११ पेक्षा अधिक देशांमध्ये शिवाजी महाराजांची जयंती साजरी केली जाते.असे सांगण्यात येते की शिवाजी महाराजांकडे अनेक जातीवंत घोडे सुध्दा होते. कोणत्या घोड्यांचा वापर केव्हा करायचा हे त्यांना चांगलेच अवगत होते.शिवाजी महाराजांकडे मोती, विश्वास,तुरंगी, इंद्रायणी,गाजर,रणभीर,कृष्णा असे ७ घोडे होते.शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करतांना सुमारे ४०० गड आपल्या अधिपत्याखाली आणले होते. काही गड त्यांनी स्वतः बांधले तर काही किल्ले लढाया करून जिंकले. महाराजांचा एक गडकिल्ला म्हणजे स्थापत्यशास्त्र, व्यवस्थापन आणि गनिमी काव्याचे प्रतिकच होते. त्यामुळे मी केंद्र व राज्य सरकारला आग्रहाची विनंती करतो करतो की महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील संपूर्ण गडकिल्ल्यांची देखरेख करून सुसज्जीत केले पाहिजे. यातच शिवरायांना खरा मानाचा मुजरा ठरेल. कारण महाराष्ट्रासह संपूर्ण भारतातील गडकिल्ले ही भारताचे वैभव,धरोहर व शान आहे. कारण गडकिल्ल्यामुळेच शिवरायांच्या आठवणी पुन्हापुन्हा जागृत होतील.गडकिल्ल्यांची सुरक्षा म्हणजे शिवजयंतीच्या निमित्ताने महाराजांना खरे अभिवादन व मानवंदना ठरेल. कारण शिवरायांनी मुठभर मावळ्यांच्या साक्षीने हिंदवी स्वराज्याची स्थापना केली व संपूर्ण किल्ले काबीज केले हा अभिमान महाराष्ट्रासह संपूर्ण भारताला आहे. त्यामुळे इतिहास जागृत ठेवण्यासाठी संपूर्ण किल्ले पर्यटनाच्या दृष्टीने व शिवरायांची आठवण या उद्देशाने किल्ल्यांचे जतन करणे गरजेचे आहे. कारण शिवाजी महाराज रयतेचे राजा होतेच.त्याचप्रमाणे त्यांच्यात दैवी शक्ती सुध्दा होती. ३९६ वर्षानंतर आजही कुठल्याही गडकिल्ल्यांवर गेले तर ४ हजार फूट उंचीवर भर उन्हाळयात आपल्याला किल्ल्यावर स्वच्छ पाणी प्यायला मिळते.हा संपूर्ण शिवरायांचाच प्रताप आहे.असे सांगण्यात येते की वयाच्या १७ व्या वर्षी शिवरायांनी स्वतः डिझाईन करून रायगड किल्ला बांधल्याचे सांगण्यात येते. आई जगदंबेच्या आशीवार्दाने शिवाजी महाराजांनी आपले संपूर्ण काम फत्ते केले व मावळ्यांमध्ये उर्जा निर्माण करून मोगलांना भुईसपाट केले.अबझल खानासारख्या महाकाय शक्तीशाली सरदाराला गनीमीकाव्याने यमलोक पोहचवीले. अशाप्रकारे मोगलांच्या संपूर्ण सरदारांना एक-एक करून धाराशाही करण्याचे काम शिवरायांनी व त्यांच्या सरदारांनी आणि मावळ्यांनी केले. हा देश साधुसंतांचा,थोरमहात्म्यांचा, क्रांतीकारकांचा व हिंदवी स्वराज्याची स्थापना करणाऱ्या शिवरायांचा देश आहे.याची जोपासना महाराष्ट्र व केंद्र सरकारने करावी अशी मी आग्रहाची विनंती करतो.महाराष्ट्रातील १२ गडकिल्ले युनेस्कोच्या यादीत समावेश करण्यात आले ही महाराष्ट्रासह देशासाठी आनंदाची व अभिमानाची गोष्ट आहे.यामुळे जागतिक वारसा यादीत भारताचे नाव समाविष्ट झाले असून पर्यटनाला मोठी चालना मिळणार आहे.देशात वाढते अत्याचार रोखण्यासाठी, महागाई,शेतकरी व कामगारांच्या समस्यांचे निवारण करण्यासाठी शिवरायांच्या तत्त्वांच्या अनुकरणाचा वापर करून केंद्र व राज्य सरकारने रयतेच्या सुरक्षेची व सुख-समृध्दीची जबाबदारी स्वीकारावी. यातच खरे शिवजयंतीचे महत्त्व दिसून येईल.त्याचप्रमाणे शिवजयंतीच्या निमित्ताने महाराष्ट्र सरकारने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपन करायला हवे.यामुळे संपूर्ण गडकिल्ले सुशोभित होईल व जिकडे-तिकडे आपल्याला हिरवागार गालीचा दिसून येईल. त्याचप्रमाणे शिवजयंतीच्या निमित्ताने बदलते हवामान लक्षात घेता वृक्ष लागवड सर्वच स्तरातून झाली पाहिजे.याकरीता प्रत्येक व्यक्तीने जर वृक्ष लागवड केली तर प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात, फळात आपल्याला शिवाजी महाराजांचे दर्शन अवश्य होईल व त्यांच्या आठवणी अनंत काळापर्यंत टीकुण राहील.त्यामुळे शिवजयंतीचे औचित्य साधून सरकार, राजकीय पक्ष,शाळा-महाविद्यालये,सामाजिक संघटना,शिव भक्त व देशातील नागरिक यांनी प्रत्येकांनी एक तरी झाड लावले पाहिजे. यामुळे वाढत्या प्रदुषणावर मात करण्यास मोठी मदत होईलच व ऑक्सिजनची मात्रा वाढेल.त्याच प्रमाणे गुरांना चारा व संपूर्ण जीवसृष्टीला ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल. त्यामुळे एकाच दिवशी लाखो झाडे लावल्या जातील ही झाडे अनेक युगांपर्यंत सर्वांच्याच स्मरणात राहिल.छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त माझा मानाचा मुजरा.जय हिंद.

हर हर महादेव
जय भवानी !जय शिवाजी !



**रमेश कृष्णराव लांजेवार**
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# जिल्ह्यातील ७५८ ग्रामपंचायतीच्या निवडणूकीसाठी सुरु होणार प्रभाग रचनेचा कार्यक्रम

## २० फेब्रुवारी पासून प्रारुप प्रभाग रचनेस सुरुवात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्यातील ७५८ ग्रामपंचायतीच्या सदस्यांची मुदत फेब्रुवारी २०२६ पर्यंत संपत आहे. त्यामुळे या ग्रामपंचायतीवर प्रशासकांची नेमणूक करण्याचे आदेश यापूर्वीच निवडणूक आयोगाने दिले आहेत. आत्ता या ग्रामपंचायतीच्या निवडणूकीसाठी २० फेब्रुवारी पासून प्रभाग रचना निश्चित करण्याची प्रक्रिया सुरु करण्याचे आदेशही ग्राम विकास खात्याने मगळवारी जिल्हाधिकारी यांना दिले आहेत.

ग्रामपंचायत निवडणुकीसाठी ग्रामविकास खात्याकडून विलेल्या सूचनेनुसार २० फेब बारी रोजी सहसीलदार यांना गुगल अर्थने प्रत्येक गावाचे नकाशे तयार करण्यास सांगण्यात आले आहे. त्यानंतर २७ फेब्रुवारी पर्यंत तलाठी व ग्रामसेवक यांनी संयुक्त स्थळपाहणी करुन प्रभाग पाडून त्याची सीमा निश्चित करावे असे आदेश देण्यात आले आहे.

तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडून ५ मार्च पर्यंत प्रारूप प्रभागरचनेची तपासणी करण्यात येणार आहे. या समितीत गटविकास अधिकारी व संबंधित मंडळ अधिकारी यांचाही समावेश असणार आहे.

तहसीलदार यांच्या समितीकडून प्रारूप प्रभाग रचनेचा अहवाल प्रांताधिकारी यांच्या मान्यतेने ११ मार्च पर्यंत जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करण्यात येणार आहे. १७मार्च पर्यंत जिल्हाधिकारी यांनी प्रारुप प्रभाग रचनेवर दुरुस्ती किंवा आवश्यक अभिप - प. निवडणूक आयोगाकडे सादर करण्यात येणार आहे.

२३ मार्च पर्यंत जिल्हाधिकारी यांच्याकडून दाखल करण्यात आलेल्या प्रारुप प - स्तावावर निवडणुक आयोगाकडून निर्णय घेण्यात येणार आहे त्यानंतर ३० मार्च रोजी तहसीलदार यांच्या समितीकडून दुरुस्तीसह नव्या प्रारुप प्रभाग रचनेस मान्यता देण्यात येणार आहे

तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली निश्चित करण्यात आलेल्या प्रारुप प्रभाग रचनेवर नागरिकांकडून ७ एप्रिल पर्यंत हरकती मागविण्यात येणार आहेत. १३ एप्रिल पर्यंत प भाग रचनेवर हरकती दाखल करण्यासाठी नागरिकांना वेळ देण्यात येणार आहे. त्यानंतर दाखल झालेल्या हरकतीवर प्रांताधिकारी यांच्या स्तरावर २१ एप्रिल पर्यंत सुनावणी प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. २३ एप्रिल पर्यंत प्रांताधिकारी यांच्याकडून सविस्तर अहवाल पुन्हा जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करण्यात येणार आहे. प्रातांधिकारी यांच्याकडून दाखल करण्यात आलेला प्रारुप प्रभाग आराखडा जिल्हाधिकारी यांच्याकडून २८ एप्रिल पर्यंत राज्य निवडणूक आयोगास सादर करण्यात येणार आहे. त्यानंतर ४ मे रोजी राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेनुसार अंतिम प्रभाग रचना जिल्हाधिकारी यांच्याकडून प्रसिध्द करण्यात येणार आहे.

सोलापूर जिल्ह्यातील ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीची मुदत संपत असलेल्या एकूण ७५८ ग्रामपंचायतींवर प्रशासकांची नेमणूक राज्य शासनाच्या आदेशानुसार करण्यात येत आहे. यासाठी जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार पंचायत समितीचे विस्तार अधिकारी, ग्रामविकास अधिकारी यांची नियुक्ती तुर्त करण्यात येत आहे. सोलापूर जिल्ह्यातील ५० ग्रामपंचायतींची पंचवार्षिक मुदत ही २०२४ मध्ये संपली आहे. त्यानंतर या ग्रामपंचायतीच्या निवडणुका घेण्यात आल्या नाहीत. तर ६५८ ग रामपंचायतीच्या सदस्यांची मुदत ही फेब्रुवारी २०२६ रोजी संपत आहे.




### प्रभाग रचनेस सुरुवात मात्र ग्रामपंचातीच्या निवडणूका होणार पावसाळ्यातच

महापालिका, जिल्हा परिषद व नगरपालिकेच्या निवडणूकीनंतर आता निवडणूक आयोगाकडून ग्रामपंचायतीच्या निवडणूकीची तयारी सुरु करण्यात आली आहे. यासाठी फेब्रुवारी महिन्यापासूनच प्रारुप प्रभाग रचनेच्या कामास सुरुवात होणार असली तरी प्रत्यक्षात ग्रामपंचातीच्या निवडणूकीचा बिगुल पावसाळ्यातच वाजणार हे स्पष्ट होत आहे.

# श्री मार्कंडेय रुग्णालयाच्या वतीने महापौर कोंड्याल यांचा सत्कार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालयाच्या वतीने नूतन महापौर तथा संचालक विनायक कोंड्याल यांच्या महापौरपदी निवडीबद्दल त्यांचा गौरवपूर्ण सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते श्री महर्षी मार्कंडेय महामुनी यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर रुग्णालयाचे चेअरमन डॉ. माणिक गुर्रम यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी विनायक कोंड्याल यांच्या सामाजिक, शैक्षणिक व आरोग्य क्षेत्रातील सातत्यपूर्ण कार्याचा गौरव करत त्यांच्या निवडीबद्दल अभिनंदन केले.यावेळी प्रेसिडेंट श्रीसत्यनारायण बोल्ली व चेअरमन डॉ. माणिक गुर्रम यांच्या हस्ते विनायक कोंड्याल यांचा सत्कार करण्यात आला. तसेच श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालय कर्मचारी पतसंस्था, इरप्पानण्णा बोली ब्लड बँक तसेच डॉक्टर वर्ग यांच्या हस्ते ही विनायक कोंड्याल यांचा सत्कार करण्यात आला.



रुग्णालयाचे प्रेसिडेंट सत्यनारायण बोल्ली यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, विनायक कोंड्याल यांनी सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी नेहमीच पुढाकार घेतला असून त्यांचे नेतृत्व दूरदृष्टीपूर्ण आणि सर्वसमावेशक आहे. त्यांच्या कार्यशैलीमुळे प्रशासनात पारदर्शकता व कार्यक्षमतेला चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच शहरातील आरोग्य सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी महापौर म्हणून ते निश्चितच विशेष प्रयत्न करतील, असेही त्यांनी नमूद केले. महापौर विनायक कोंड्याल यांनी आपल्या मनोगतात सत्काराबद्दल कृतज्ञता व्यक्त करत सांगितले की, सोलापूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आपण सर्व घटकांना सोबत घेऊन काम करू. महानगरपालिकेच्या माध्यमातून आरोग्य, पायाभूत सुविधा व नागरिकांच्या मूलभूत गरजांवर विशेष भर देण्यात येईल. श्री मार्कंडेय सहकारी रुग्णालयाशी असलेले आपले जिव्हाळ्याचे नाते कायम ठेवून आरोग्य सेवांचा दर्जा उंचावण्यासाठी आपण कटिबद्ध राहू, असे त्यांनी स्पष्ट केले..

या प्रसंगी सुरेश फलमारी, अशोक अडम, डॉ. विजयकुमार आरकाल, श्रीनिवास क्यातम, श्रीनिवास कमटम, लक्ष्मीनारायण कुचन, पार्वतय्या श्रीराम, डॉ. लता पाटील, डॉ. सुधाकर गुंडेली, डॉ. अंधारे, डॉ. सुहास पुजारी, डॉ. सांभारभं आदी मान्यवर उपस्थित होते.व्हाईस चेअरमन रमेश विडप यांनी आभार प्रदर्शन केले.कार्यक्रमाचा समारोप उत्साही वातावरणात झाला.

## वात्रटिका

### भेसळ जगणं

किती निर्ढावलेत लोक
सहज चालतो जीवाशी खेळ....
दुध म्हणून घेतो,पितो आम्ही
त्यात आहे जीवघेणी भेसळ...
काही पचवले आहे आम्ही
हे काही तसे अवघड नाही...
गुन्हेगार सापडून सुद्धा फक्त
गाजावाजा आणि बडबड होई...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# अखिल भारतीय डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेच्या केंद्रीय अध्यक्षपदी राजा माने



**कोल्हापूर (कटूसत्य वृत्त):-** अखिल भारतीय डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेच्या केंद्रीय अध्यक्षपदी वरिष्ठ संपादक राजा माने यांची बिनविरोध निवड निवड केंद्रीय व राज्य कार्यकारणी समितीच्या कोल्हापूर येथे झालेल्या बैठकीत करण्यात आली.

यावेळी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी सांगोला सोलापूर येथील सतीश भाऊ सावंत राज्य महासचिवपदी कराड येथील विकास भोसले प्रदेश उपाध्यक्षपदी अहिल्यानगर येथील इकबाल शेख, केंद्रीय उपाध्यक्षपदी महेश कुगावकर व अमोल पाटील यांची तर राष्ट्रीय सचिव पदी तेजस राऊत, संघटनेच्या साप्ताहिक विभागाच्या प्रदेशाध्यक्षपदी संजय कदम, गोवा प्रदेशाध्यक्षपदी अनिल पाटील तर मध्य प्रदेश प्रदेशाध्यक्षपदी प्रवीण कुमार खारीवाल यांच्या देखील निवडी करण्यात आल्या.

यावेळी प्रतिबिंब प्रतिष्ठानचे विश्वस्त दीपक नलवडे संघटनेचे पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष सुहास पाटील, पश्चिम महाराष्ट्र संघटक विनायक कलढोणे, राज्य कार्यकारणी सदस्य सचिन भिलारे, राज्य समन्वयक गणेश बोतालजी, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष सुभाष चिंधे, सातारा जिल्हाध्यक्ष संतोष शिराळे, सांगली जिल्हा अध्यक्ष मनोहर पवार, कोल्हापूर जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब फास्के, छत्रपती संभाजी नगर जिल्हाध्यक्ष रमेश नेटके, पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष धनंजय पानसांडे, सातारा जिल्हा कार्याध्यक्ष सोमनाथ साखरे यांच्यासह राज्याभरातून आलेल्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

## चौकशीची जाहीर नोटीस

एस.आर.एन.क्रमांक:- SLP/00022/18/26
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय सोलापूर**

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक श्री दशमहाविद्या आराधना पिठम चॅरिटेबल ट्रस्ट कुंभारी बाबत ।
न्यासाचा पत्ता :- गटनं. ६१९, कुंभारी, सोलापूर, सोलापूर, सोलापूर, सोलापूर } अर्जदार
अर्जदार- प्रवीण नामदेव मुसपेठ,

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-
(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय? (२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

जंगम मिळकत (वर्णन)

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १ | Corpus Fund | ५००१.०० |

(अ) जंगम मिळकत : रोख रु. ५००१/- मात्र (अक्षरी रुपये पाच हजार एक मात्र फक्त)

स्थावर मिळकत(वर्णन):-

| शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|
| N0 | N0 | N0 | N0 | N0 | 0.00 |

(ब) स्थावर मिळकत : रोख रु. ०/- मात्र ( अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक १७-०२-२०२६ रोजी दिली.

(कोर्टाचा शिक्का)

**अधिक्षक सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,सोलापूर**

## चौकशीची जाहीर नोटीस

एस.आर.एन.क्रमांक:- SLP/04602/18/25
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय सोलापूर**

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांकश्रीराम चॅरिटेबल ट्रस्ट सोलापूर बाबत ।
न्यासाचा पत्ता :-सी - ११०२, विदी घरकुल, सोलापूर, सोलापूर, सोलापूर, सोलापूर } अर्जदार
अर्जदार- योगीनाथ वासुदेव बंडी,

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, सोलापूर, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-
(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय? (२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

जंगम मिळकत (वर्णन)

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १ | Corpus Fund | १००१.०० |

(अ) जंगम मिळकत : रोख रु. १००१/- मात्र (अक्षरी रुपये एक हजार एक मात्र फक्त)

स्थावर मिळकत(वर्णन):-

| शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|
| N0 | N0 | N0 | N0 | N0 | 0.00 |

(ब) स्थावर मिळकत : रोख रु. ०/- मात्र ( अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक १७-०२-२०२६ रोजी दिली.

(कोर्टाचा शिक्का)

**अधिक्षक सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,सोलापूर**

# अवैध वाळू वाहतूकीवर महसूल प्रशासनाची कारवाई



**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** भीमा नदीपात्रात अवैध वाळू उपसा व वाहतूकीसाठी वापरण्यात येणारे २२ थमाकीलचे तराफे महसूल प्रशासनाच्या पथकाकडून नष्ट करण्यात आले असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

पंढरपूर तालुक्यातील अवैध वाळू उपसा रोखण्यासह वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्यासाठी प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसिलदार सचिन लंगुटे यांनी विविध पथकांची नेमणूक केली आहे. भीमा नदी पात्रात पंढरपूर शहर व भुटूंबरे दरम्यान वाळू वाहतुकीसाठी वापरण्यात येणारे २२ थमाकीलचे तराफे मंगळवार दि. १७ फेब्रुवारी २०२६ रोजी नष्ट केले आहेत.

या कारवाई करण्यामध्ये मंडळ अधिकारी पंढरपूर विजय शिवशरण बाळासाहेब कदम, रिंगण चव्हाण व तालुक्यातील ग्राम महसूल अधिकारी, अमर पाटील, प्रमोद खंडागळे, महेश कुमार सावंत, संजय खंडागळे, गणेश पिसे, किरण बाडीवाले, विराज लोटेकर, सुमित जाधव, पियुष भोसले, संदीप शिनगारे, आनंद सोनवणे, रविकिरण लोखंडे, नागनाथ खांडेकर, राहुल घुटाळ , रामदास खंदारे,गणेश तांमोर, विवेक चव्हाण, नवनाथ मोरे, अब्दुलसलीम चांदकोटे, मंगेश बनसोडे हे सहभागी होते.

# लिपिक टंकलेखक (गट-क) पदभरतीसाठी ऑनलाईन परीक्षा 14 मार्च रोजी

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सैनिक कल्याण विभाग व विभागाच्या अधिपत्त्याखालील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांतील लिपिक टंकलेखक (गट-क) या पदाच्या सरळसेवेतील भरती करिता एकूण ७२ पदांसाठी ऑनलाईन परीक्षा घेण्यात येणार आहे. सदर परीक्षा टीसीएस- आयओएन यांच्या मार्फत दिनांक १४ मार्च २०२६ रोजी दुपारी ०१.०० ते ०३.०० या वेळेत ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहे. असे संचालक (निवृत्त) कर्नल दिपक ठोंगे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# मुंबईत 'AI 4AGRI 2026' : जगातील सर्वात मोठी कृषी परिषद

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासनाने शेतीला उपग्रह व कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात नेण्यासाठी ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. येत्या 22 व 23 फेब्रुवारी 2026 रोजी मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर (BKC) येथे 'AI 4AGRI 2026' या जागतिक परिषदेचे आयोजन होणार आहे. या परिषदेत जागतिक बँक, आशियाई विकास बँक (ADB), संयुक्त राष्ट्र (UN) यांसारख्या नामांकित संस्थांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. शेतकरी, विद्यार्थी, संशोधक, स्टार्टअप्स आणि कृषी उद्योजकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे. ही परिषद आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने शेतकऱ्यांचे भविष्य बदलणारा महाकुंभ ठरणार आहे.

## महाराष्ट्र शासन
### सार्वजनिक बांधकाम विभाग
### कार्यकारी अभियंता (विद्युत) विभाग, सोलापूर यांचे कार्यालय
### ९१६, सिव्हिल लाईन राष्ट्रीय महामार्ग वसाहत, सोलापूर ४१३००३

जावक.क्र.का.अ./सोविवि/निलि/२८६/२०२६ दूरध्वनी क्रमांक. (०२१७) २३१२८९४
दिनांक- ११/०२/२०२६ Email ID- elsolapur.ee@gmail.com,elsolapur.ee@mahapwd.gov.in

### निविदा सुचना क्र. ३६/२०२५-२६

कार्यकारी अभियंता, सोलापूर विद्युत सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर महाराष्ट्र शासनाकडील अनुज्ञाप्तीधारक, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागास नोंदणीकृत व अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणा-या ठेकेदाराकडून B-1 (Percentage Rate) नमुन्यातील निविदा मागवित आहे. निविदा कागदपत्रे शासनाच्या www.mahapwd.com वरील Pay PWD Online या पोर्टलवरुन डाउनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा व अथवा रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सोलापूर विद्युत सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. (कामाचे नाव : निविदेत एकूण ०४ कामे आहेत.)

| Sr. No | Estimate No & Name of work | Tender Amount | Class of Contractor |
|---|---|---|---|
| 1) | Est no . 131099 of 24 - 25 Providing air conditioning unit to Sonography room, Xray room and Laboratory at 100 beded District hospital Solapur, dist: Solapur | 459925.00 | Bidders Should have valid Electrical Contractor License issued. by I.E.& L Dept. Maharashtra and Registered Electrical Contractor Class D or above issued by Public works (Electrical) Department, Government of Maharashtra. |
| 2) | Est no . 1310213 of 25-26 Providing Repairs to El at AC Meeting Hall and Cashier Room of Dr. V.M.Medical College Solapur Dist: Solapur | 322463.00 | |
| 3) | Est no . 134376 of 25-26 Providing 30 KVA DG Set as a backup power supply to Rural Hospital Mohol, Tal-Mohol Dist - Solapur | 635293.00 | |
| 4) | Est no . 134373 of 25-26 Providing 30 KVA DG Set as a backup power supply to Subdistrict Hospital Karmala, Tal-Karmala Dist -Solapur | 635293.00 | |
| 5) | Est no . 134381 of 25 - 26 Providing 30KVA DG Set as a backup power supply to Rural Hospital Natepute, Tal-Malshiras Dist -Solapur | 635293.00 | |
| 6) | Est no . 134392 of 25-26 Providing 30 KVA DG Set as a backup power supply to Rural Hospital Shetfal, Tal - Mohol Dist - Solapur. | 635083.00 | |
| 7) | Est no . 2310243 of 25-26 Providing Repairs to EI in NICU and passege of the NICU at B Block of SCSM general hospital Solapur, Dist: Solapur | 314393.00 | |
| 8) | Est no . 2310241 of 25 - 26 Providing Repairs to El in the passege of the ground floor of OPD buidling at SCSM general hospital solapur,dist:solapur | 423205.00 | |
| 9) | Est no. 131098 of 24 - 25 Providing air conditioning unit to Eclampsia Room and Labour Room at 100 beded District hospital Solapur, dist: Solapur | 531785.00 | |
| 10) | Est no . 232006 of 25 - 26 Providing Street Lights, Replacement of damaged unserviceable Submersible motor pump near SY TY Hostel in the premises of Government Polytechnic, Solapur Dist- Solapur | 392455.00 | |

१. निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक १८/०२/२०२६ते दिनांक २५/०२/२०२६
२. निविदा पुर्व बैठक व स्थळ :- निरंक
३. निविदा उघडणे :- दिनांक २६/०२/२०२६ रोजी कार्यकारी अभियंता, सोलापूर विद्युत सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर, ९१६, सिव्हिल लाईन राष्ट्रीय महामार्ग वसाहत, सोलापूर-४१३००३.
खालील संकेतस्थळावर निविदेची सर्व माहिती उपलब्ध आहे. (www.mahapwd.com)

**सही/- (श्री.सु.गुजरे)**
**कार्यकारी अभियंता**
**सोलापूर सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, सोलापूर**

जिमाका/सो/जाहि/३१९/२५-२६

## जाहीर प्रसिध्दीकरण

क्र/अभिलेख/कावि/३६/२०२६ नि.

**मोहोळ येथील मा.तहसिलदार सो,यांचे कोर्टात**

ब्रम्हदेव विष्णू व्यवहारे,वय-४० वर्षे, धंदा-शेती, रा. मुंढेवाडी, ता. मोहोळ,जि. सोलापूर. }अर्जदार

**विरुध्द**

ग्रामपंचायत मुंढेवाडी,ता. मोहोळ, जि. सोलापूर(अर्जाची नोटीस ग्रामसेवक मुंढेवाडी,ता.मोहोळ, यांचेवर बजाविण्यात यावी). }सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार ब्रम्हदेव विष्णू व्यवहारे यांचा चुलता बिबिशेन दत्तात्रय व्यवहारे यांचा जन्म ता.०१/०६/१९६८ रोजी अर्जदार आज्जी किशाबाई दत्तात्रयव्यवहारे हिचे पोटी मौजे मुंढेवाडी, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदारयांनी सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराचा चुलत्याची जन्म दाखल्याचीता.१२/०२/२०२६ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनीत्यांच्याकडील जुन १९६८ चे अभिलेखात अर्जदार यांचे चुलते बिबिशेन दत्तात्रय व्यवहारे याचा जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला.

त्याअर्थी सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात अर्जदार यांच्या चुलत्याची जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे.याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.१०/०३/२०२६ रोजी किंवा ही नोटीसप्रसिध्द केल्यापासुन १५दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजरराहुन आपले म्हणणे मांडावे, मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यासअर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे.ता.१७/०२/२०२६

लिपीक (शिक्का) हुकूमावरुन
**मा. तहसिलदार सो, मोहोळ**

# केंद्रीय माध्यमिक परीक्षा मंडळ परीक्षाकाळात कलम १६३ लागू



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** केंद्रीय माध्यमिक परीक्षा मंडळ (नवी दिल्ली) यांच्यामार्फत इयत्ता १० वी व इयत्ता १२ वीच्या परीक्षा दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ ते २७ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आल्या आहेत. परीक्षेदरम्यान कोणताही गैरप्रकार, दळणवळण साधनांचा गैरवापर किंवा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये तसेच परीक्षार्थींना अडथळा येऊ नये, यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आला आहे.

पोलीस उप आयुक्त (गुन्हे/विशा) सोलापूर शहर डॉ. अश्विनी पाटील यांनी दिलेल्या आदेशानुसार, दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ ते २७ मार्च २०२६ (सुट्टीचे दिवस वगळून) सकाळी ९.०० ते दुपारी २.०० या वेळेत खालील परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात प्रतिबंध लागू राहणार आहेत —

- केंद्रीय विद्यालय, मोदी रेल्वे पुलाजवळ
- जांबवीर चौक
- केएलई इंग्लिश मिडीयम प्रशाला, नरसिंह नगर
- डी-मार्टजवळ, जुळे सोलापूर
- इंडियन मॉडेल स्कूल
- सिंहगड पब्लिक स्कूल, केगांव

सदर परीक्षा केंद्रांवर केंद्रीय माध्यमिक परीक्षा मंडळ च्या इयत्ता १० वी व १२ वीच्या परीक्षा संपेपर्यंत पुढील बाबींवर बंदी घालण्यात आली आहे —

- परीक्षा केंद्र परिसरात घोषणा देणे किंवा सार्वजनिक शांततेस बाधा आणणारे कृत्य करणे.
- १०० मीटर परिसरातील झेरॉक्स, फॅक्स, टायपिंग सेंटर, एसटीडी बूथ, संगणक केंद्र, इंटरनेट कॅफे, ध्वनीक्षेपक तसेच पानपट्टी आदी सुविधा सुरू ठेवणे.
- मोबाईल फोन, टॅबलेट, स्मार्ट वॉच, सेल्युलर फोन, वायरलेस सेट, कॅल्क्युलेटर, ट्रान्झिस्टर किंवा अन्य इलेक्ट्रॉनिक साधनांसह परिसरात प्रवेश करणे.
- परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात वाहनांना प्रवेश देणे.
- परीक्षा प्रक्रियेशी संबंधित नसलेल्या व्यक्तींनी (उमेदवारांचे नातेवाईकांसह) परिसरात प्रवेश करणे.
- पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींनी एकत्र येणे.

तथापि, परीक्षा प्रक्रियेशी संबंधित शासकीय अधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, परीक्षार्थी, पोलीस अधिकारी, अंमलदार व होमगार्ड यांना त्यांच्या कर्तव्यपूर्तीसाठी हा आदेश लागू राहणार नाही.

या आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधित व्यक्तीवर भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम २२३ अन्वये कारवाई करण्यात येईल, असे डॉ. अश्विनी पाटील यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## Classified - छोटी जाहीरात

### निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय
**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)


### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहितातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | ■ | ६ | | ७ | | ८ |
| ९ | | ■ | १० | | | ■ | | ■ | | ■ | |
| | ■ | ११ | ■ | ■ | १२ | १३ | ■ | १४ | | १५ | |
| १६ | १७ | | १८ | ■ | ■ | १९ | | | ■ | | ■ |
| २० | | ■ | २१ | | २२ | | ■ | २३ | २४ | ■ | २५ |
| ■ | २६ | | | ■ | | ■ | २७ | | | २८ | |
| २९ | | ■ | | ■ | ३० | ३१ | | ■ | ३२ | | ■ |
| | ■ | ३३ | | | ■ | ३४ | | ३५ | | ■ | ३६ |
| ३७ | | | | ■ | ३८ | | ■ | | ■ | ३९ | |
| ■ | ■ | | ■ | ■ | | ■ | ४० | | ४१ | | ■ |
| ४२ | ४३ | | ■ | ४४ | | | | ■ | ४५ | | ४६ |
| ४७ | | ■ | ४८ | | | ■ | ■ | ■ | | ■ | |

**उभे शब्द :** १) आमदार या सभागृहासाठी जनतेतून निवडून दिले जातात २) श्वसनेंद्रिय ३) बारीक खडी, चक उलट लिहा ४) राशीचक्रातील एक रास ५) लहान डोंगर ६) एक म्हण-** वसे ते स्वप्नी दिसे ७) एक अभिनेता-*** दामले ८) दारू (हिंदीत) ११) धरणग्रस्त आंदोलनाच्या नेत्या-** पाटकर १३) घर (हिंदीत) १४) स्त्रियांनी कपाळभर लावलेले कुंकू १५) उन्हाळ्यात पिले जाणारे एक दुग्धपेय १७) कोकणातील एक प्रख्यात तालुका १८) महानगरपालिकेवर वॉर्डमधून निवडून जाणारा लोकप्रतिनिधी २२) दहा गुणिले नऊ २४) नशीब (हिंदीत) २५) हात, हस्त, टॅक्स (मराठीत) २७) कष्टाची सवय असणारा २८) फटाक्यांची माळ २९) वाळवलेली खजूर ३१) एक रास ३३) खोडकर (हिंदीत) ३५) दैत्य, राक्षस ३६) याच्यापासून ताक बनवितात ३८) रावणाची बहीण ३९) प्रश्न (हिंदीत) ४०) वेग ४१) स्त्रिया केसात बांधतात ती फुलांची माळ ४२) पक्ष्याचे पंख (हिंदीत) ४३) लोभ, स्वार्थ ४४) बंदूक (इंग्रजीत) ४६) दहा (हिंदीत)

**आडवे शब्द :** १) शिवसंग्राम संघटनेचे संस्थापक
६) भारतातील एक राज्य
९) भीती, दरारा १०) स्पर्धेमध्ये विजेत्या संघास दिला जाणारा कप
१२) मंद प्रकाश (इंग्रजीत) १४) स्वार्थ, हेतू
१६) मनाची तृप्तावस्था, मुलाचे एक नाव
१९) लहान बाळाच्या डोळ्यात घालतात ते २०) कपाळ
२१) श्रीगणेशाचे एक नाव २३) तव उलट लिहा
२६) एक म्हण-हाजीर तो *** २७) खर्चात केलेली बचत
२९) एक म्हण-** तशी माती
३०) कोकण किंवा समुद्रालगतचे हवामान
३२) पतीचा भाऊ ३३) लग्नातील वधू मुलगी ३४) कसयुक्त, सत्व अर्क असलेली
३७) बेळगाव या राज्यात आहे ३८) धाडसी, पराक्रमी
३९) स्वाक्षरी ४०) बोलबाला, बोभाटा
४२) सूर्य उगवण्यापूर्वीचा उष:काल
४४) गणेशोत्सवात आपण याची प्रतिष्ठापना करतो ४५) गतीने, वेगात
४७) वर उलट लिहा ४८) पगार (हिंदीत)

## सुडोकु - 180

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 6 | | 3 | | 8 | 1 | | |
| 5 | 8 | 1 | | | 9 | 6 | | |
| | | 3 | 5 | | | | | |
| | 9 | | 8 | | 2 | | | |
| | | | 7 | 4 | 5 | 9 | 3 | 6 |
| 3 | 5 | | | | 6 | 8 | | 4 |
| 1 | 3 | 5 | | | | | | |
| 7 | | 8 | 6 | 1 | 3 | 4 | | |
| 9 | 4 | | | | 7 | 3 | | |

# शिवजन्मोत्सव मंडळातर्फे बुधवारी कलाकृती उद्घाटन कार्यक्रम

## दोरी, स्टील पाईपने शिवरायांची 22 फुटी कलाकृती साकारली

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शिवजन्मोत्सव (मध्यवर्ती) महामंडळ ट्रस्ट, सोलापूर व सुभाष पवार यांच्यावतीने चित्रकार विपुल मिरजकर यांनी छत्रपती शिवरायांची अद्वितीय कलाकृती दोरी, स्टील पाईपच्या सहाय्याने 22 बाय 22 फुटाची साकारली आहे. त्याचे उद्घाटन बुधवार, दि. 18 फेब्रुवारी रोजी करण्यात येणार आहे, अशी माहिती महामंडळाचे उत्सव अध्यक्ष जयवंत सलगर यांनी पत्रकार परिषदेत दिली.




या विशेष कलाकृतीमध्ये दोऱ्याचा (थ्रेड आर्ट) आणि स्टील पाईपचा वापर करून तसेच सात दिवसांची मेहनत घेऊन छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रभावी प्रतिमा साकारण्यात आली आहे. एकूण कलाकृतीचा आकार सुमारे २२ बाय २२ फूट (सुमारे ४५० चौरस फूट) इतका आहे. ही कलाकृती वर्ल्ड रेकॉर्डसाठी पाठविण्यात आलेली आहे. या कलाकृतीचा उद्घाटन सोहळा

छत्रपती शिवाजी महाराज चौकात बुधवार, दि. १८ फेब्रुवारी रात्री १० वाजता होणार आहे. याच दिवशी रात्री बारा वाजता शिवजयंतीचा पाळणा कार्यक्रम होणार आहे.

पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार विजयकुमार देशमुख, आमदार सुभाष बापू देशमुख, आमदार देवेंद्र कोठे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, भाजपचे शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर चंद्रकांत वानकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडणार आहे.

या पत्रकार परिषदेस महामंडळाचे ट्रस्टी अध्यक्ष पद्माकर काळे, श्रीकांत डांगे, विपुल मिरजकर आदी उपस्थित होते.

# श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळ

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे पत्रकारांच्या हस्ते पूजन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर येथील डाळिंबी आड परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेची महाआरती श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने सोलापूरमधील विविध दैनिकांचे पत्रकार, चॅनल प्रतिनिधी व छायाचित्रकार यांच्या हस्ते उत्साहात पार पडली.

या वेळी ट्रस्टी अध्यक्ष पद्माकर काळे, उत्सव अध्यक्ष जयवंत सलगर, अक्कलकोट अन्नक्षेत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मजेयराजे भोसले, राजन जाधव, प्रीतम परदेशी, सुभाष पवार, सुजित चौगुले,



प्रकाश ननवरे, सदाशिव पवार, लक्ष्मण महाडिक, नागेश वडणे, देविदास घुले, ब्रह्मदेव पवार, जे. जे. कुलकर्णी, प्रशांत बडवे, मोहन दाते, दादा सुरवसे, अनिल तडवळकर, अश्विनी तडवळकर, नितीन मोहिते, सचिन स्वामी, सचिन चव्हाण, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ चे मनीष केत,विक्रम खेलबुडे, अविनाश कुलकर्णी, कृष्णकांत चव्हाण, पांडुरंग सुरवसे, दीपक शेळके, महेश हणमे, सागर सुरवसे, विजयकुमार देशपांडे, हरिश्चंद्र कदम, राहुल रणदिवे, किरण बनसोडे, संदीप वाडेकर, नितीन पात्रे, विशाल भांगे, विश्वभूषण लिमये, आदित्य केंगार, शिवानंद एरटे, यासिन शेख, भद्रशेट्टी, आभिषेक आद्यप्पा, प्रीतम पंडित, संतोष कासे, विक्रांत कालेकर, यशवंत सादुल, नितीन खटके यांच्यासह विविध माध्यमांचे पत्रकार, छायाचित्रकार व कॅमेरामन मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सदाशिव पवार यांनी केले, तर आभार उत्सव अध्यक्ष जयवंत सलगर यांनी मानले. महाआरतीनंतर उपस्थित मान्यवरांनी शिवजन्मोत्सवाच्या पार्श्वभूमीवर समाजातील एकात्मता आणि ऐतिहासिक परंपरेचे जतन करण्याचा संकल्प व्यक्त केला.

# नातेपुते शहर व परिसरात शांतता, कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी प्राधान्य- विशाल वायकर

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** नातेपुते शहराची बाजारपेठ मोठी आहे. अनेक शाळा कॉलेज आहेत. शहरात दहिगाव चौक व काही ठिकाणी वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण होत आहे. अनेकजण आपली वाहने रस्त्यावर निष्काळजीपणाने लावलेली दिसतात अशा वाहनावर दंडात्मक कारवाई करणार आहे. नातेपुते शहर व परिसरात शांतता कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्राधान्य देणार असून नागरिकांनी कायद्याचे पालन करावे असे



आवाहन नातेपुते पोलीस ठाण्याचे नूतन सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल वायकर यांनी केले आहे.

विशाल वायकर यांनी नुकताच नातेपुते पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारला आहे त्यांनी सोलापूर या ठिकाणी स्थानिक गुन्हे शाखेला काम पाहिले असून गुन्हे तपास यंत्रणेचा त्यांना दांडगा अनुभव आहे. नातेपुते पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महारुद्र परजणे यांची सातारा या ठिकाणी बदली झाली असून त्या जागी सपोनी विशाल वायकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.नातेपुते पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महारुद्र परजणे यांनी २०२४ ते २०२६ या कालावधीत नातेपुते शहरात व परिसरात पोलिसी खाकीचा दबदबा ठेवला होता. महिला मुलींची छेड काढणाऱ्या रोड रोमियो यांना चांगला चोप दिला होता. समन्वय ठेवून उत्कृष्ट प्रकारे काम नातेपुते व परिसरात केले होते तसेच काम व आपल्या पोलिसी खाकीचा दबदबा नातेपुतेचे नूतन पोलीस अधिकारी सपोनी विशाल वायकर ठेवणार का ? याकडे नातेपुते व परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील साहित्यिक पुरस्कारांची घोषणा

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** शंकरनगर (ता.माळशिरस) येथील श्री विजय गणेश उत्सव मंडळ ट्रस्ट तर्फे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी साहित्यातील उल्लेखनीय योगदानाबद्दल दिले जाणारे मानाचे " सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील साहित्यिक पुरस्कार - २०२६ " जाहीर करण्यात आले आहेत. या गौरव सोहळ्याचे आयोजन सोमवार दि.२३ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता उदय सभागृह शंकरनगर येथे करण्यात आले असल्याची माहिती पुरस्कार समितीच्या अध्यक्षा स्वरूपाराणी जयसिंह मोहिते पाटील यांनी दिली.

महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या शुभहस्ते हे पुरस्कार



प्रदान करण्यात येणार आहेत.

या पुरस्काराचे मानकरी व त्यांचे कार्य डॉ.जयसिंगराव पवार (विशेष जीवनगौरव पुरस्कार) ज्येष्ठ इतिहास संशोधक आणि व्यासंगी अभ्यासक म्हणून डॉ. जयसिंगराव पवार यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. छत्रपती शिवाजी महाराज आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या इतिहासावर त्यांनी केलेले सखोल संशोधन महाराष्ट्राच्या इतिहास लेखनाला नवी दिशा देणारे ठरले आहे. डॉ. सदानंद देशमुख (विशेष पुरस्कार) मराठी साहित्यातील ग्रामीण जीवनाचे वास्तव मांडणारे प्रख्यात कादंबरीकार, त्यांच्या 'बारोमास' या कादंबरीला साहित्य अकादमी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. ग्रामीण जगण्यातील संघर्ष आणि शेती संस्कृती त्यांच्या लेखनाचा मुख्य गाभा आहे.कवी नारायण सुमंत (साहित्यिक पुरस्कार) एक संवेदनशील कवी आणि लेखक म्हणून त्यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. सामाजिक जाणिवा आणि मानवी भावभावनांचे दर्शन त्यांच्या साहित्यातून घडते.

हा पुरस्कार वितरण सोहळा दि. २३ फेब्रुवारी २०२६ सकाळी १०:०० वाजता उदय सभागृह शंकरनगर येथे आयोजित केलेला आहे. श्री विजय गणेश उत्सव मंडळाच्या वतीने आयोजित या सोहळ्याला परिसरातील सर्व साहित्यप्रेमी,वाचक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

या पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम, सन्मानचिन्ह, मानाचा फेटा,शाल व श्रीफळ असे आहे. आयोजकः श्री विजय गणेश उत्सव मंडळ आणि मराठी साहित्य परिषद शाखा अकलूज

# पै. श्रीनिवास पाथरूट यांना 'श्री सिद्धेश्वर केसरी २०२६' किताब

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाशिवरात्री यात्रेनिमित्त जय हनुमान तालीम संघ, सारोळे (ता. महोळ) यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य जंगी कुस्ती स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. हजारो कुस्तीप्रेमींच्या उपस्थितीत पार पडलेल्या या स्पर्धेत 'श्री सिद्धेश्वर केसरी २०२६' या मानाच्या किताबासाठी महाराष्ट्रातील नामांकित मल्लांमध्ये चुरशीच्या लढती रंगल्या.या विशेष कुस्ती मैदानाचे उद्घाटन आमदार राजू खरे व सोलापूर महानगरपालिकेचे महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते करण्यात आले. आमदार राजू खरे व सोलापूर महानगरपालिकेचे महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्तेच 'श्री सिद्धेश्वर केसरी २०२६ - ट्रिपल महाराष्ट्र चॅम्पियन' पै. श्रीनिवास पाथरूट आणि पै. अरमान पटेल यांच्यातील मानाचा अंतिम सामना खेळविण्यात आला. अत्यंत अटीतटीच्या आणि रोमहर्षक झालेल्या या लढतीत



पै. श्रीनिवास पाथरूट यांनी उत्कृष्ट कौशल्याचे प्रदर्शन करत विजय मिळवला आणि 'श्री सिद्धेश्वर केसरी २०२६' या किताबाचे मानकरी ठरले. आरंभ फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष यशवंत पाथरूट यांच्या वतीने व विठ्ठलअण्णा पाथरूट यांच्या स्मरणार्थ श्रीनिवास पाथरूट यांना चांदीची गदा सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले.स्पर्धेत राज्यातील विविध भागांतील नामांकित तसेच उदयोन्मुख मल्लांनी सहभाग घेतला होता. प्रत्येक सामन्यात मल्लांनी ताकद, चिकाटी आणि तांत्रिक कौशल्याचे उत्कृष्ट दर्शन घडवले. याच कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय जलतरणपटू कु. श्रावणी सूर्यवंशी यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्यांच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील यशाबद्दल उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.या प्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून जिल्हा परिषद सदस्य चरणराज चवरे,नगरसेवक बोज्जू अण्णा प्रधाने, नगर सेवक व्यकटेश कोंडी, नगर सेवक युवराज सरवदे, अक्षय अजिखाने, विश्वास शिंदे,अर्जुन जाधव,यशवंत पाथरूट, जनार्दन अण्णा पाथरूट, शंकर अण्णा पाथरूट, हनुमंत अण्णा पाथरूट, कमलेश पाथरूट, आनंदकुमार शिंदे, समाधान पाथरूट, सिताराम पाथरूट, सुरज पाथरूट आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी आमदार राजू खरे यांनी कुस्ती हा महाराष्ट्राचा अभिमानास्पद पारंपरिक खेळ असल्याचे सांगत ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन देण्याची गरज व्यक्त केली.

महापौर विनायक कोंड्याल यांनी विजेत्या मल्लांचे व जलतरणपटू श्रावणी सूर्यवंशी यांचे अभिनंदन करून अशा स्पर्धांमुळे तरुणांमध्ये खेळाडूवृत्ती व आत्मविश्वास वाढीस लागतो, असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जय हनुमान तालीम संघाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. महाशिवरात्रीनिमित्त आयोजित या जंगी कुस्ती मैदानामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

# ईच्छा भगवंताची परिवाराच्या वतीनं आ. सचिन कल्याणशेट्टीसह सौ.शांभवीताई, मिलन आणि सागर कल्याणशेट्टी यांचा सन्मान

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अक्कलकोट तालुक्यात नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत भाजपाने दणदणीत विजय मिळवत एकहाती सत्ता संपादन केली. चपळगाव जिल्हा परिषद गणातून पाणीदार आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या धर्मपत्नी शांभवीताई कल्याणशेट्टी या मोठ्या मताधिक्याने विजयी झाल्या, तर सागर कल्याणशेट्टी यांनी पंचायत समिती गणातून विजय मिळवला. याचबरोबर अक्कलकोट नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदी युवा तरुण तडफदार मिलन कल्याणशेट्टी विराजमान झाले आहेत. या दणदणीत यशानिमित्त ईच्छा भगवंताची परिवाराच्या



वतीने सत्कार करण्यात आले. मार्गदर्शक किसन जाधव यांनी आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी व शांभवीताई यांना फेटा बांधून, पेढे भरवून व भला मोठा हार घालून गौरव केला. नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. भाजप म्हणजे विकास आणि विकास म्हणजे भाजप हे समीकरण अक्कलकोटकरांनी पुन्हा अधोरेखित केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण व पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर जिल्ह्यात भाजप अव्वल स्थानी पोहोचला असून, त्यात आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या सक्षम, धडाडीच्या नेतृत्वाचे मोलाचे योगदान असल्याचे भाजप नगरसेवक किसन जाधव यांनी ठामपणे सांगितले. अक्कलकोट ही ब्रह्मांडनायक श्री स्वामी समर्थ यांचे पावन भूमी असून धार्मिक व पर्यटनदृष्ट्या शहराचा झपाट्याने विकास करण्याचा संकल्प आमदार कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केला धार्मिक नगरीचा सर्वांगीण विकास हेच आमचे ध्येय,असेही त्यांनी ठामपणे सांगितले. या सत्कार सोहळ्याप्रसंगी प्रभाग २२ च्या नगरसेविका सौ.चैत्रालीताई शिवराज गायकवाड, युवा उद्योजक शिवराज गायकवाड, चेतन नागेश अण्णा गायकवाड, यशवंत जाधव, संतोष गायकवाड हुडको, हुलगप्पा शासम, महादेव राठोड, प्रसाद मनीगर्ल आदींची उपस्थिती होते.

# शंकरनगरच्या शिवतीर्थ कुस्ती मैदानात इचलकरंजीचा श्रीमंत भोसले विजयी

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** इचलकरंजी कोल्हापूरचा मल्ल श्रीमंत भोसले याने पुण्याचा मल्ल राहुल सुळ याच्यावर गुणांनी मात करीत विजय प्राप्त केला. विजेता व उपविजेता मल्लास रोख रुपये ५१ हजार बक्षीस देण्यात आले.

महाशिवरात्री यात्रा महोत्सव समिती चॅरिटेबल ट्रस्ट शंकरनगर यांच्यावतीने शिवतीर्थ आखाड्यात जंगी कुस्त्याचे भव्य मैदान आयोजित केले होते. या मैदानात मल्ल श्रीमंत भोसले व मल्ल राहुल सूळ यांच्यात अंतिम कुस्ती झाली. सुरुवातीला दोघांनी वीस मिनिटे एकमेकाची ताकद आजमावली. यानंतर पंचांनी त्यांना गुणावर कुस्ती साठी पाच मिनिटांचा वेळ दिला.या मध्ये



प्रथम गुण प्राप्त करणाऱ्या मल्ल श्रीमंत भोसले यास विजेते घोषित करण्यात आले.

या कुस्त्यांच्या मैदानाचे उद्घाटन दुपारी ३ वाजता राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, समितीचे कार्याध्यक्ष मदनसिंह मोहिते पाटील व आखाडा प्रमुख सयाजीराजे मोहिते पाटील यांच्या हस्ते झाले.

यावेळी समितीचे अध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील प्रमुख उपस्थित होते.


या आखाड्यात २०० निकाली कुस्त्या झाल्या. या मैदानात हर्षवर्धन गुरव पाणीव याने गजानन चव्हाण गारअकोले यावर मात केली. रणजीत पवार नातेपुते यांने दादा कोकाटे माळशिरस यावर मात केली. मैदानात अनेक चुरशीच्या लढती प्रेक्षकांना पहावयास मिळाल्या.

या वेळी सहकार महर्षी कारखान्याचे व्हा. चेअरमन शंकरराव माने देशमुख, रावसाहेब मगर,वसंत जाधव, महाराष्ट्र केसरी छोटा रावसाहेब मगर, संचालक सतीश शेंडगे, नानासाहेब मुंडफणे, विराज निंबाळकर, अमरदीप काळकुटे, रामचंद्र ठवरे, प्रकाशराव पाटील, सुरेश मेहेर, शिवाजी सिद, भीमराव काळे, महादेव घाडगे, केशव ताटे देशमुख, दत्ता मगर यांच्यासह असंख्य कुस्ती शौकीन उपस्थित होते.

# एकरूख योजनेतून उजनीचे पाणी कुरनूर धरणात सोडले

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अक्कलकोट तालुक्यासाठी वरदायिनी असलेल्या कुरनूर धरणात सध्या उजनी धरणातून सोडण्यात आलेले पाणी मिसळत आहे. एकरूख योजनेच्या माध्यमातून येत असलेले हे पाणी सध्या हरणा नदीत खळखळते आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. उजनी धरणात अक्कलकोट व दक्षिण सोलापूर तालुक्यांतील काही भागांसाठी ३ टीएमसी पाणी आरक्षित आहे. वर्षातून दोन टप्प्यांमध्ये हे पाणी सोडण्याची प्रक्रिया राबविण्यात येते.

दोन वर्षांपूर्वी एकरूख उपसा सिंचन योजनेची यशस्वी चाचणी घेण्यात आली होती. यानंतर सातत्याने हे पाणी कुरनूर धरणात



सोडण्यात येत आहे.

वास्तविक यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे कुरनूर धरण जवळपास दोन महिने ओव्हरफ्लो झाले होते. यानंतरही धरणात ८२२ दशलक्ष घनफुट म्हणजेच १०० टक्के पाणीसाठा शिल्लक होता.

मात्र, सद्यःस्थितीत बाष्पीभवन, विविध पाणीपुरवठा योजनेतील पाणीउपसा व शेतीसाठी सुरू असलेल्या पाणी उपशामळे धरणात ९० टक्के म्हणजेच ७५०. ६४३ दशलक्ष घनफुट इतका पाणीसाठा शिल्लक आहे.

प्राप्त मुबलक पाणीसाठ्यामुळे यंदाच्या वर्षी दुष्काळी परिस्थिती उद्भवणार नसल्याचे चित्र आहे, पण तरीही पाणीवापर प्रक्रियेचा विचार करता उजनीचे येणारे पाणी हे अक्कलकोट तालुक्यासाठी लाखमोलाचे ठरणार आहे. सोडलेल्या पाण्यामुळे कॅनॉल शेजारील हरभरा, गहू, ऊस, ज्वारी उत्पादक शेतकरी व स्थानिकांना आधार मिळत आहे.

२८ फेब्रुवारीपर्यंत पाणी सुरू

३१ जानेवारीपासून उजनी धरणाच्या डाव्या कालव्यातून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. हे पाणी कारंबा शाखा कालवामार्गे हिप्परग्यातील एकरूख तलाव-हिप्परगा पंप हाऊस ते बोरामणी पंप हाऊस-दर्शनाळ कालव्याद्वारे हरणा नदीतून कुरनूर धरणात येते. संबंधित विभागाकडून मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार हे पाणी २८ फेब्रुवारीपर्यंत सुरू ठेवण्याची शक्यता आहे.

तीन नगरपालिका, ५२ गावांसाठी कुरनूर धरणावर अवलंबून असलेले शेतकरी, ३ नगरपालिका व ५२ गावांच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लागावा, यासाठी संबंधित विभागाला एकरूख योजनेच्या माध्यमातून कुरनूर धरणात पाणी सोडण्यासाठी यापूर्वीच आदेश देण्यात आले आहेत. संबंधित विभागाकडून तशी कार्यवाही देखील सुरू आहे.

**- सचिन कल्याणशेट्टी,** आमदार

# उपमुख्यमंत्री शिंदे यांची खा. धैर्यशील मोहिते पाटील यांनी घेतली भेट

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांची खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी ठाणे येथे सदिच्छा भेट घेऊन, माढा लोकसभा मतदारसंघातील विविध प्रलंबित विकास कामांबाबत सविस्तर चर्चा केली. या बैठकीत माढा लोकसभा मतदारसंघातील महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (MSRDC) अंतर्गत प्रलंबित रखडलेल्या रस्ते व पुलांच्या कामांमुळे वाहतूक कोंडी, अपघाताचा धोका तसेच नागरिकांना होणाऱ्या



अडचणींबाबत खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी मंत्री महोदयांचे लक्ष वेधले व प्रलंबित कामांना तातडीने पूर्ण करणे निर्देश द्यावे म्हणून विनंती केली.

तसेच मतदारसंघातील अकलूज, करमाळा, माढा व नातेपुते येथील नगरपरिषद व नगरपंचायती अंतर्गत पाणीपुरवठा, रस्ते, ड्रेनेज, अंतर्गत गटार योजना, सार्वजनिक सुविधा व नागरी विकासाशी संबंधित विविध विकास कामांचे निवेदन दिले व तातडीने मंजुरी देण्यात यावी म्हणून विनंती केली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्व प्रस्तावांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून संबंधित विभागांना त्वरित कार्यवाहीचे निर्देश देण्याचे आश्वासन दिले. या भेटीमुळे माढा लोकसभा मतदारसंघातील प्रलंबित विकासकामांना गती मिळणार असून नागरिकांना लवकरच दिलासा मिळेल, असा विश्वास खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी व्यक्त केला.

# शिवजयंती निमित्त सामाजिक कार्यक्रमाच्या 'कोन्हेरी फेस्टिव्हल'चे आयोजन

## प्रा. नितीन बानगुडे पाटील व प्रा. गणेश शिंदे यांचे व्याख्यान

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त शिवमुद्रा सामाजिक प्रतिष्ठान तर्फे कोन्हेरी (ता. मोहोळ) येथे १८ ते २२ फेब्रवारी दरम्यान डीजे, डॉल्बी, मिरवणूक यासह अनावश्यक खर्चाला फाटा देऊन विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन केले असून यामध्ये व्याख्यान, किर्तन, रक्तदान शिबिर, मोफत आरोग्य शिबिर आदि उपक्रमाचा समावेश असल्याची माहिती सयोजकांनी दिली.

मोहोळ तालुक्यातील कोन्हेरी



येथे शिवमुद्रा सामाजिक प्रतिष्ठान तर्फे कोन्हेरी फेस्टिव्हल अंतर्गत विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन प्रत्येक वर्षी करण्यात येते.

याच पार्श्वभूमीवर यावर्षी



दि.१८ फेब्रुवारी रोजी रक्तदान शिबिर व मोफत आरोग्य निदान शिबिर, तर दि.१९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना होणार आहे. तर दि.२० जानेवारी रोजी प्रा. गणेश शिंदे यांचे "जीवन सुंदर आहे" या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. तर दि.२१ जानेवारी रोजी १२ वर्षांपुढील भव्य खुल्या डान्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यासह दि.२२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध शिवव्याख्याते प्रा. नितीन बानगुडे पाटील यांचे व्याख्यान आयोजित केले असून या सर्व कार्यक्रमाचा लाभ परिसरातील नागरिकांनी घेण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे.